Exh. 51/D

रे.क.नं. ९४/२०२६

**मे. दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कागल**
**यांचे कोर्टात ...**

**१. सचिन लक्ष्मण जानवे, वगैरे** ... वादी

विरूध्द

**१. नाना जोती कांबळे, वगैरे** ... प्रतिवादी

**सी.पी.सी. कलम १५१ प्रमाणे अर्ज.**

OrderOther side to

**यातील प्रतिवादी नं. १, २, ४ ते ९, १२ ते १५, १७, १८, २१ ते २७, ३१, ३३, ३४, ३५, ५२, ५५ ते ६३, ६५, ६६, ६८, ७०, ७१, ७४, ७५, ७८, ७९ व ८१ तर्फे विनंती अर्ज असा की,**

१) वादीनी प्रस्तुत प्रतिवादी विरूध्द मे. दिवाणी न्यायाधिशसो, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांचेसमोर रे.क.नं. ९२२/२०२५ हा आज्ञार्थी व कायम मनाईकरीता दाखल केला होता. तथापि, मे. वरिष्ठ न्यायालयांचे आदेशाप्रमाणे सदरचे काम सी.पी.सी. ऑर्डर ७ रूल १० प्रमाणे या मे. कोर्टात वर्ग झाले आहे.

MADKE AJIT BHISHMA

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.07.13 18:20:01 +0530

२) सदरचे काम वर्ग होत असताना सी.पी.सी.मधील तरतुदीप्रमाणे निव्वळ दावा वर्ग होणे आवश्यक व कायदेशीर होते व आहे. तथापि, तसे न होता दावेसोबत अनावश्यक कागदपत्रे व मनाईचा अर्ज देखील या मे. कोर्टात वर्ग झाला आहे. वस्तुत: प्रस्तुत कामासोबत आलेला मनाई अर्ज हा रे.क.नं. ९२२/२०२५ या

मे. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांचेसमोरील दावेतील आहे. सदर मनाई अर्जास प्रस्तुत दावेचा म्हणजेच रे.क.नं. ९४/२०२६ हा नंबर मिळालेला नाही व मिळणार देखील नाही. कारण तो रे.क.नं. ९२२/२०२५ या दावेतील मनाई अर्ज आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुत कामी नि. ३ सोबतची कागदपत्रे देखील रे.क.नं. ९२२/२०२५ या कामातील आहेत. अंतरिम अर्ज, मुदत अर्ज हे सर्व मूळ दावा रे.क.नं. ९२२/२०२५ मधील असलेने सदरची सर्व कागदपत्रे, अंतरिम व तुर्तातुर्त मनाई अर्ज हे देखील परत पाठविणे कायदेशीर होणार आहे.

३) सदर कामी नि. ४६ वर यातील वादींनी मनाईचा अर्ज दाखल केला आहे. सदरचा मनाईचा अर्ज मूलतः चालणेस पात्र नाही. कारण सदर कामी वादींचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दाखल नाही. त्या कारणाने प्रस्तुत नि. ४६ वरील इश्यु नोटीसीचा झालेला आदेश रिकॉल करणे कायदेशीर होणार आहे.

४) प्रस्तुत वादींची नि. ४६ वरील मनाईची मागणी नि. ५ चे अर्जाचे निकालापर्यंत आहे असे अर्जातील कथनावरून दिसून येते. तथापि, कलम २ मध्ये नमूद केलेप्रमाणे प्रस्तुत कामी नि. ५ वर मनाईचा अर्ज दाखल नाही. नि. ५ वर जो अर्ज दिसतो तो मे. वरिष्ठ न्यायालय, कोल्हापूर यांचेसमोरील आहे. त्याचप्रमाणे मे. वरिष्ठ न्यायालयातील रे.क.नं.९२२/२०२५ मधील उर्वरित प्रोसिडींग मागविणेबाबत वादींचा कोणताही अर्ज अगर मे. न्यायालयाचा आदेश नाही. त्या कारणाने नि. ४६ वर झालेला आदेश रिकॉल करणे कायदेशीर होणार आहे.

५) **<u>सबब मे. कोर्टांना विनंती की</u>**

अ) नि. ४६ वरील आदेश रिकॉल करणेबाबत योग्य तो आदेश व्हावा.

ब) अन्य अनुषंगिक आदेश याच कामी व्हावेत.

येणेप्रमाणे अर्ज असे.

मे. जा. व्हावे.

कागल

दि. १३/०७/२०२६

(१) व.मु. विठ्ठल हौकु चव्हाण

(२) व.मु. वसंत हनु सरगाळे

(३) व.मु. दशरथ कृष्णा सरगाळे